MHKO180001372026

<u>संक्षीप्त फौजदारी खटला क्र.७५/२०२६</u>
<u>महाराष्ट्र सरकार वि. म्हेरुद्दीन नरुद्दीन जमादार</u>

:: <u>न्या य नि र्ण य</u> ::
**निशाणी क्र.०७ लगत**
(अधिघोषित दिनांक ०२.०७.२०२६)

अभियोगपक्षातर्फे विद्यमान सहाय्यक सरकारी वकील श्री.सं.सि.नदाफ व आरोपीतर्फे विद्यमान वकील श्री. प्र.व.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

०२. अभिलेखावरील पुराव्यावरुन व दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थीत झालेले मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासहित खालीलप्रमाणे :–

| | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | आरोपी घटनेवेळी विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी दारुच्या बाटल्या बाळगून असतेवेळी राज्य उत्पादन शुल्क कर्मचारी यांना मिळून आला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | ... आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

०३. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने पंच अरविंद देवू कांबळे यांची एकमेव साक्ष निशाणी क्र.०७ लगत नोंदविली आहे. त्यानंतर, तक्रारदार जवान मुकेश राजेंद्र माळगे, तपासीक अंमलदार दुय्यम निरीक्षक श्रीमती एम.पी.खेत्री, राज्य उत्पादन शुल्क, इचलकरंजी क्र.२ व उर्वरीत साक्षीदार यांची साक्ष नोंदविण्याकरीता अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने उक्त साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. त्यामुळे, अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी क्र.०१ वरील आदेशान्वये बंद करण्यात आला. आरोपीस गुन्ह्यात गोवण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणला नसल्यामुळे आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

:: <u>कारणमिमांसा</u> ::

<u>मुद्दा क्र.1 करीता</u> :-

०४. पंच अरविंद यांनी दिनांक ०६.१०.२०२५ रोजी राज्य उत्पादन शुल्क कर्मचा-यांनी एका कागदावर त्यांची सही घेतल्याचे कथन केले आहे. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सही त्यांची असली तरी, त्यातील मजकुराविषयी त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

०५. पंच अरविंद हे अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे विद्यमान सहाय्यक सरकारी वकील यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. मात्र, त्यामधुन अभियोगपक्षास उपयुक्त अशी कोणतीही बाब अभिलेखावर आणता आली नाही. त्यामुळे, पंच अरविंद यांच्या साक्षीपुराव्यातुन अभियोगपक्षास प्रस्तुत प्रकरणातील घटना तसेच घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा सिध्द करता आला नाही.

०६. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने तक्रारदार तथा नमुना वाहक जवान शेटे, तपासीक अंमलदार खेत्री व दुसरे पंच सागर यांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. तक्रारदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास छापील प्रथम खबरी अहवाल सिध्द करता आला नाही. तसेच, तपासीक अंमलदार खेत्री व पंच सागर यांच्या साक्षीपुराव्याअभावी आणि पंच अरविंद यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे अभियोगपक्षास घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा सिध्द करता आला नाही.

०७. अभियोगपक्षाने प्रादेशिक न्यायसहाय्यक वैद्यकिय प्रयोगशाळा, कोल्हापूर येथून रासायनिक पृथ्थ:करण अहवाल प्राप्त करुन अभिलेखावर दाखल केला नाही. सबब, तपासीक अंमलदार खेत्री यांनी घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्याद्वारे जप्त केलेला तथाकथीत मुद्देमाल निश्चितपणे देशी दारु होती किंवा काय, याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. त्यामुळे, अभियोगपक्षाने जरी उपरोक्त नमूद साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविली असती तरी जोपर्यंत

घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्याद्वारे जप्त केलेला तथाकथीत मुद्देमाल निश्चितपणे देशी दारुच होती, ही बाब रासायनिक पृथ्थ:करण अहवालातुन अभियोगपक्ष संशयापलीकडे सिध्द करत नाही, तोपर्यंत आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द होवू शकत नाही.

०८. वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, पंच अरविंद यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे तसेच, तक्रारदार, नमुना वाहक जवान शेटे, तपासीक अंमलदार खेत्री व पंच सागर यांच्या साक्षीपुराव्याअभावी आणि रासायनिक पृथ्थ:करण अहवालाअभावी अभियोगपक्षास आरोपीविरुध्द कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सुसंगत असा सबळ पुरावा अभिलेखावर आणला नाही. त्यामुळे, अभियोगपक्षास आरोपीविरुध्द लावण्यात आलेल्या गुन्ह्याची मुलतत्वे संशयापलीकडे सिध्द करता आली नाहीत. सबब, अभियोगपक्षास आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करता आला नाही. म्हणुन, मुद्दा क्र.१ करीता मी नकारार्थी उत्तर देत आहे.

**मुद्दा क्र.२ करीता** :–

०९. अभियोगपक्षाच्या एकुण साक्षीपुराव्यावरुन आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपीस संशयाचा फायदा देवून त्याची प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. म्हणुन, मुद्दा क्र.२ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**:: आ दे श ::**

१. आरोपी म्हेरुद्दीन नरुद्दीन जमादार याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) या गुन्ह्यातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन कद्बे रद्द करण्यात येत आहेत.

३. जप्त मुद्देमालातील एक कापडी पिशवी, एक प्लास्टीकचा मग व तीन काचेचे ग्लास हे मुल्यहीन व निरुपयोगी असल्यामुळे सदर मुद्येमाल अपीलीय कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४. तपासीक अंमलदार यांनी जप्त मुद्देमालातील देशी दारुच्या बाटल्यांचा अपीलीय कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता सदर मुद्देमाल मा. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांच्याकडे महाराष्ट्र दारु प्रतिबंधक अधिनियमाचे कलम १०० व १०१ अन्वये पाठवावा.

५. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी सहा महिने कालावधीकरीता रक्कम रुपये १५,०००/– किंमतीचे वैयक्तीक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचे एका जामीनदाराचे बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.07.02 17:52:44 +0530

दिनांक : ०२.०७.२०२६.
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड.